**पेसा ग्रामसभा मोबिलायझर यांची**
**<u>जबाबदारी व कर्तव्ये</u>**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः रागांप- २०१६/प्र.क्र.१०१ /योजना-४**

ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड,फोर्ट,मुंबई-४०० ००१
तारीख: २२ जानेवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

**या विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः रागांप- २०१६/प्र.क्र.१०१ /योजना-४, दि.२२ जून,२०१६.**

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र शासनाने माहे डिसेंबर, १९९६ मध्ये अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींना स्वयंशासनाचा अधिकार देणारा कायदा पारित करण्यात आला आहे. या कायद्याच्या अनुषंगाने लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे या कायद्याने अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला इतर ग्रामसभेपेक्षा काही विशेष अधिकार प्रदान केले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, कलम ५४ अ, ब, क व ड, पेसा कायद्याचे नियम, २०१४ आणि वन हक्क कायद्याने ग्रामसभेला दिलेल्या अधिकारांचा समावेश आहे. पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेला प्राप्त झालेले अधिकार हे प्रथा परंपरांचे जतन व संवर्धन करणे, आपापसातील तंटे / विवाद मिटविणे, सरकारी योजनेचे लाभधारक निवडणे, विविध कामांना / योजनांना मंजूरी देणे, उपयोगिता प्रमाणपत्र देणे तसेच जमीन, जंगल, पाणी, बाजार, सावकारी, विकास कामावर व विकास कामे करणा-या यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे याबाबत आहेत. पेसा कायद्याने प्राप्त झालेल्या अधिकारांची लोकांना माहिती व्हावी. तसेच ग्रामसभेचे बळकटीकरण होऊन, आदिवासींच्या विकासाला चालना मिळावी, यासाठी केंद्र शासनाने ग्रामसभा मोबिलायझर मार्फत ग्रामसभांचे ससंगीकरण (मोबिलायझेशन) करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या पंचायतराज विभागाने हस्तपुस्तीका प्रकाशित केलेली आहे.

या विभागाच्या दिनांक २२ जून, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रामसभा मोबिलायझरची नियुक्ती कशी करावी, याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाने त्यांच्या प्रशिक्षणासाठी व मानधनासाठी निधी मंजूर केला असून, ग्रामसभा मोबिलायझरच्या नेमणूका ग्रामसभेने निवड केलेल्या महिला बचत गटामार्फत करावयाच्या आहेत. ग्रामसभा मोबिलायझर ग्रामसभेच्या

नियंत्रणाखाली कामकाज करतील, परंतु ते ग्रामपंचायतीचे नोकर / कर्मचारी असणार नाहीत. तसेच ते ग्रामसभेची इच्छा असेपर्यंत व तरतूदीच्या कालावधीपर्यंत कार्यरत राहतील.

**शासन परिपत्रक** :-

राज्य शासनाने ग्रामसभा मोबिलायझर यांची कर्तव्ये दिनांक २२ जून, २०१६ च्या परिपत्रकान्वये निश्चित केलेली आहेत. तथापि, त्यांना कामकाजाबाबत दिशादर्शन होणेसाठी बाबनिहाय कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**अ. ग्रामसभा मोबिलायझरची कर्तव्ये :-**

- ग्रामसभा मोबिलायझर गृहभेटी देवून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेचे महत्व व अधिकार ग्रामस्थांना समजावून सांगेल तसेच, सर्व मतदार ग्रामसभेला उपस्थित राहतील, यासाठी प्रयत्नशील राहील.
- ग्रामसभा मोबिलायझर पेसा कायदा, वन हक्क कायदा व विकास योजनांच्या अंमलबजावणी बाबतचे सद्यस्थितीदर्शक सर्वेक्षण करेल त्यानंतर त्याचा अहवाल ग्रामसभेपुढे सादर करील व त्याची प्रत पंचायत समिती व जिल्हा परिषदेला पाठवेल.
- ग्रामसभा मोबिलायझर सावकारी, भूसंपादन व पुनर्वसन, जमीन हस्तांतरण, अंमली पदार्थांचे सेवन, गरजू परंतु सरकारी योजनेचा लाभ न मिळालेले, शेती व पिण्याच्या पाण्यापासून वंचित, अन्यायग्रस्त अशा लोकांच्या घरी जावून त्यांना कायद्याच्या तरतूदी समजावून सांगेल. अशा लोकांचा गट तयार करुन त्यांच्या अडचणी ग्रामसभेत मांडण्यास त्यांना प्रवृत्त करावे.
- ग्रामसभा मोबिलायझर जल, जंगल, जमीन व जनावरे संबंधाने बलस्थाने, उणीवा, संधी, धोके यासंबंधाने सर्वेक्षण करुन ग्रामसभेपुढे मांडेल व त्याची प्रत पंचायत समिती व जिल्हा परिषदेला पाठवेल.
- ग्रामसभा मोबिलायझर पशुसंवर्धन, जमीन व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रोजगार, प्रथा परंपरा, शांतता व सुव्यवस्था याबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करुन त्यासाठी लोकांचे गट तयार करेल व त्यांच्या समस्या ग्रामसभेत मांडण्यास प्रवृत्त करेल.
- ग्रामसभा मोबिलायझर वन जमिनीवरील विकास हक्क, सामुदायिक वन हक्क, सामुदायिक वन संसाधन हक्क, गौण वन उपजाबाबतचे हक्क याबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करुन त्यासाठी लोकांचे गट तयार करून त्यांच्या समस्या ग्रामसभेत मांडण्यास प्रवृत्त करेल.

- वरीलप्रमाणे गावामध्ये तयार झालेल्या विविध गटांचे प्रमुख व सदस्य यांना ग्रामसभा मोबिलायझर ग्रामसभेत उपस्थित ठेवून ग्रामसभेत निर्णय पारित झाल्यानंतर संबंधीत अधिका-याकडे कामाचा पाठपुरावा करील व त्याची माहिती ग्रामसभेत ठेवील.
- ग्रामसभा मोबिलायझर वरील कामाचा तिमाही व वार्षिक अहवाल तयार करुन तो ग्रामसभेत ठेवील व त्याची प्रत पंचायत समिती व जिल्हा परिषदेला पाठविल.

**ब. <u>ग्रामसभा मोबिलायझरच्या जबाबदा-या</u> :-**

- ग्रामसभा मोबिलायझर ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली काम करील.
- ग्रामसभेचे कामकाज सूरळीतपणे पार पाडण्यासाठी, सभेचा अध्यक्ष व ग्रामसेवक यांना ग्रामसभेची नोटीस काढणे, ग्रामसभेबाबत प्रसिध्दी देणे, ग्रामसभेचा कार्यवृत्तांत तयार करणे,ग्रामसभेच्या ठरावानुसार कार्यवाही करण्यासाठी पत्रव्यवहार करणे यासाठी सहाय्य करावे.
- ग्रामसेवक अनुपस्थित असेल व सभेच्या अध्यक्षाने आदेश दिल्यास तो ग्रामसभेचा सचिव म्हणून कामकाज पार पाडील.
- सभेच्या नोटीसीमध्ये ग्रामसभेची तारीख, वेळ, ठिकाण व सभेत करण्यात येणारे कामकाज याची माहिती दिलेली असते, ती सर्वांना कळविण्याची खातरजमा करील.
- ग्रामसभा खुल्या व मुक्त वातावरणात पार पाडल्या जातील, ग्रामसभेबाबत लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल यासाठी तो प्रयत्नशील राहील. हे करण्याकरीता तो संबंधीत अधिका-याचे मार्गदर्शन सुध्दा घेईल.
- ग्रामसभा मोबिलायझर प्रत्येक ग्रामसभेत ग्रामसभा ठरावांच्या अंमलबजावणीचा आढावा ठेवील. त्यामध्ये ठरावाचा क्रमांक, दिनांक, तपशिल, ठराव कोणाकडे व केव्हा पाठविला आणि त्यावर झालेली कार्यवाही, याचा समावेश असेल.
- ग्रामसभा मोबिलायझर शासकीय अधिकारी, आदिवासी विकास संस्था आणि ग्रामस्थ यांच्यामधील दुवा म्हणून काम करील तसेच गावक-यांच्या समस्या त्यांच्या लक्षात आणून देईल व त्या कामाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवील.
- ग्रामसभा मोबिलायझर ग्रामसभेच्या स्थायी समित्यांना गरजेप्रमाणे मदत करील. तसेच त्यांच्या कामकाजाच्या नोंदी ठेवणेकामी त्यांना सहाय्य करील. वेगवेगळ्या स्थायी समित्या किंवा ग्रामपंचायत क्षेत्रातील वेगवेगळ्या गावांच्या ग्रामसभा यामध्ये तो समन्वय ठेवण्यासाठी सहाय्य करील.

- ग्रामसभा मोबिलायझर शासनाच्या / जिल्हा परिषदेच्या किंवा ग्रामसभेच्या मदतीने ग्रामसभा सदस्य व समिती सदस्य यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून त्यांचे ज्ञान अदययावत ठेवण्याचा प्रयत्न करील. यासाठी तो शासकीय अधिका-यांचे गरजेप्रमाणे सहाय्य घेईल.
- ग्रामसभा मोबिलायझर गावक-यांच्या विकासाला चालना देणारे कार्यक्रम आयोजित करण्यास अधिका-यांना / आदिवासी विकास संस्थांना / व्यक्तिंना सहाय्य करील.
- ग्रामसभा मोबिलायझर प्रत्येक ग्रामसभेत ग्रामसभा ठरावांच्या अंमलबजावणीचा खालीलप्रमाणे आढावा ठेवील.

  ग्रामसभा ठरावाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती (गावाचे नाव...तालुका...जिल्हा...)

| अ.क्र. | ग्रामसभा ठराव क्र. | दिनांक | ठरावाचा तपशील | ठरावाच्या अंमलबजावणीची स्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कोणाकडे व केव्हा पाठविला | झालेली कार्यवाही व दिनांक |
| | | | | | |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२२१०३४४६६९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Mahadev Gengaje

Digitally signed by Rajendra Mahadev Gengaje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=aadac6f62a04dc76f59a0a873d1263c7d14f6ea5080bb750bf392303a1a35907, cn=Rajendra Mahadev Gengaje
Date: 2018.01.22 11:24:59 +05'30'

**( रा. म. गेंगजे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव

४. मा. मंत्री (आदिवासी विभाग) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
७. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
८. मा. विधानसभा/मा. विधान परिषद सदस्य (सर्व)
९. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त/ नियोजन/)
१०.मा. प्रधान सचिव/ सचिव (ग्राम विकास/ महसूल/ आदिवासी विकास/ )
११.विभागीय आयुक्त (सर्व)
१२.जिल्हाधिकारी (सर्व)
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१४. सहसचिव/ उपसचिव, ग्राम विकास विभाग (सर्व)
१५.संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
१६.राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, पुणे.
१७.निवडनस्ती